# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : शनिवार 12 जानेवारी 2013
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 10. श्री सुरेश रघुनाथ राणे |
| 2. श्री दिलिप मधुकर राणे | 11. श्री सुनिल विनायक राणे |
| 3. श्री शंकर बाळकृष्ण राणे | 12. श्री प्रविण मधुकर राणे |
| 4. श्री गंगाराम महादेव राणे | 13. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 5. श्री गुरुनाथ गणपत राणे | 14. श्री सत्यविजय शिवराम राणे |
| 6. श्री लवू शिवाजी राणे | 15. श्री सुनिल सदानंद राणे |
| 7. श्री गौरव दशरथ राणे | 16. श्री मधुसुदन श्रीधर राणे |
| 8. श्री एकनाथ अनंत राणे | 17. श्री भास्कर दौलत राणे |
| 9. श्रीमती तृप्ती अविनाश राणे | |

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक 12 जानेवारी 2013 रोजी शिरोडकर हायस्कुल परेल येथे पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांच्याबरोबर जेष्ठ नागरिक या नात्याने श्री सत्यविजय शिवराम राणे यांना मान देण्यात आला. या सभेस एकूण 17 सभासद उपस्थित होते. सभेचे अध्यक्ष स्थानापन्न झाल्यानंतर चिटणीसांनी सर्व सभासद बंधुभगिणींची स्वागत केले. त्यानंतर वाडीतील खालील दिवंगत व्यक्तीना 2 मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली वाहण्यात आली.

(1) कै प्रभाकर श्रीधर राणे (2) कै सुहासिनी वामन राणे (3) कै सिताबाई रा दळवी (4) कै झिलू राजाराम राणे
(5) कै सावजी त्रिंबक राणे (6) कै अविनाश कृष्णाजी राणे (7) कै चंद्रकांन्त सावंत (नाटककार)
(8) कै सुगंधा प्रकाश राणे

यानंतर अध्यक्ष / सचिव यांनी एकमेव महिला श्रीमती तृप्ती अविनाश राणे हिचे स्वागत केले व त्यांनी अमृत महोत्सवी कार्यक्रमास केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानन्यात आले. तसेच 02 मे 2011 रोजी पार पाडण्यात आलेल्या फळसेवाडी शाळा क्रमांक 2 चा अमृत महोत्सवी कार्यक्रमास यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे आभार मानन्यात आले. विशेषत: श्री रत्नाकर नाना राणे, श्री पांडूरंग सावजी राणे, श्री तुकाराम विनायक राणे, श्री विनोद विठोबा राणे, सौ चारुशिला मंगेश राणे (स्मरनिकेसाठी) यांचे विशेष आभार मानन्यात आले.

श्री लवू शिवाजी राणे यांनी असे सांगितले की संस्थेची वार्षिक सभा हि वेळेवर व्हावयास पाहिजे. यामध्ये वार्षिक वर्गणी, वाडीतील सुधारणा सर्दंभात वारंवार चर्चा करुन पाठपुरावा केल्यास सभासदांमध्ये एकी वाढून कामे व्यवस्थित पार

पडताता व ओळखीही वाढतात. त्यापुढे संस्थेने कमिटी मिंटींग / सर्वसाधारण सभा वेळेत घ्यावी व आपल्याला येणाऱ्या समस्यांवर चर्चा करून मार्ग काढावा.

श्री गुरुनाथ गणपत राणे यांनी असे सुचविले की मिटिंग ही वेळेत सुरु झाली पाहिजे. तसेच संस्थेचे अकाऊन्ट व सभासद रजिस्टर यांची नोंद बरोबर ठेवल्यास संस्थेकडे पैसा जमा होईल व आपुलकी वाढेल.

श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांनीही संस्थेच्या कामकाजामध्ये अमुलाग्र बदल घडविण्यासाठी सुचना केल्या. स्नेहसंम्मेलन 2 वर्षानी घेतल्यास ओळखी वाढतील तसेच संस्थेचे सभासदत्व फक्त पुरुषांना होते आता महिलांही नोकरी करू लागल्या आहेत त्यांनाही सभासदत्व दयावे. त्यांनाही कार्यकारीणी मध्ये घ्यावे जेणेकरून महिला एकत्र होऊन गावाच्या विकासाला हातभार लावतील. तसेच वर्गणीसाठी घराच्या कुटूंबप्रमुखाशी संर्पक करावा.

संस्थेचे सह-सेक्रेटरी श्री अशोक दत्ताराम राणे यांनी वर्गणी हे सुत्र धरुन सुचना मांडली की गेले बरेच वर्ष वर्गणी घेतलेली नाही त्यामुळे सभासद पट किती आहे याची पक्की संख्या नाही. तरी मागील थकीत वर्गणीचा विचार न करता आपण पुढे  एप्रिल 2013 हे वर्ष समजून वर्गणी घेऊया, जेणेकरून वसुलीचे वाद राहणार नाही. या विषयावर सर्व उपस्थितांनी भाग घेऊन मासिक वर्गणी रु.10/- प्रत्येकी प्रमाणे व वार्षिक वर्गणी रु.120/- प्रत्येकी प्रमाणे महिला, पुरुष व तरुण नोकरदार वर्ग यांचेकडून घ्यावी. तसेच नोकरीत नसणाऱ्या 18 वर्षावरील मुला-मुलींकडूनही संस्थेचे सभासदत्व फार्म भरून घ्यावेत जेणेकरून ही मुले काय काम करतात याबद्दल माहीती संस्थेकडे जमा होईल.

या संस्थेचा कार्यभार बरेच वर्षे सांभाळलेले श्री मधुसुदन श्रीधर राणे यांनी सुचविले की संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत पूर्वजांनी चालविलेल्या एकोपा यामध्ये दिसला पाहिजे यास श्री सत्यविजय शिवराम राणे, श्री भास्कर दौलत राणे, श्री सुरेश रघुनाथ राणे आणि श्री एकनाथ अनंत राणे यांनी दुजोरा दिला.

यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी सभाग्रहास अशी माहिती दिली वाडीत  एकोपा राहावा, सुखसोयी व्हाव्यात यासाठी आम्ही आजच्या सभेस  श्री तुकाराम विनायक राणे यांचेकडे पत्र देऊन श्री रत्नाकर नाना राणे व श्री अंकूश मारुती राणे यांस आजच्या सभेस बोलविले होते जेणेकरून या कर्तबगार कार्यकर्त्यांच्या मनोमिलनामुळे वाडीत सुधारणा होऊ शकतील. परंतू आज या ठिकाणी ते उपस्थित न राहिल्यामुळे पुढील चर्चा करण्यात येत नाही. यावर सर्व उपस्थितांनी स्वागत करून सांगितले की आपण हा प्रयोग केल्याबद्दल अभिनंदन परंतू आता न थांबता वाडीच्या विकासासाठी नामदार श्री नारायणराव राणे साहेब व खासदार श्री निलेश नारायणराव राणे तसेच श्री नितेश नारायणराव राणे यांस भेटून लवकरात लवकर कामाची आखणी करावी. विशेषत: पाणी व रस्ता या गोष्टींची तातडीने गरज आहे.

गावातील गावकर मंडळी व त्यांचे वागणे तसेच वाडीतील मंडळींस उत्साहाचे वेळी मिळणारी वागणूक याबद्दल चर्चा झाली यामध्य श्री दिलिप मधुकर राणे, श्री प्रविण मधुकर राणे, श्री सुरेश रघुनाथ राणे, श्री भास्कर दौलत राणे यांनी भाग घेतला.

यानंतर नवनिर्वाचीत ग्रामपंचायत सदस्य सरपंच / उपसरपंच अनुक्रमे श्रीमती सुजाता स घाडी व श्री तुकाराम म पालकर यांच्या अभिनंदनाचा ठराव सचिव श्री सुनिल सदानंद राणे यांनी मांडला त्यास सभाग्रहाने एकमुखाने मान्यता दिली व लेखी ठराव त्यांना पाठविण्याचे ठरले.
पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-01-(44 to 48)

वरील सर्व विषयांवर चर्चा झाल्यानंतर असे ठरविण्यात आले की संस्थेच्या कार्यकारीणीची बैठक निश्चित करावी जेणेकरून वाडीतील समस्या व सभासदत्व याबाबत चर्चा करण्यात येईल. यासाठी दिनांक 19 जानेवारी 2013 रोजी संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे याच्या घरी सायंकाळी 5:00 वाजता कार्यकारीणीची सभा घेण्याचे ठरले. अनुपस्थित कार्यकारीणी सदस्य श्री उदय भगवान राणे, श्री हेमंतकुमार रमेश राणे, श्री रंजन रावजी म्हसकर, श्री जयवंत नाना राणे, श्री दत्ताराम विष्णु साटम, श्री मनोहर भिकाजी राणे यांनाही सभेस बोलविण्याचे ठरले.

दिनांक 9 मे 2013 ते दिनांक 15 मे 2013 दरम्याण एकादशी सोडून ब्राम्हणभोजन करण्याचे ठरविण्यात आले. वाडीतील लोकांना ब्राम्हणभोजणाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी विनंती करण्याचे ठरविण्यात आले.

यानंतर सभेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी सर्व उपस्थितांची स्वखर्चाने चहापाणी व्यवस्था केली व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात सायंकाळी 7:00 वाजता राष्ट्रगीत गाऊन संपन्न झाली.

---